नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३१/०३/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**पो.स्टे. भिवापुर** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा आलेसुर शिवार येथे दिनांक २२/०३/२०२२ चे २०.१२ वा. चे सुमारास फिर्यादी नामे– राष्ट्रपाल चिंतामण निकोसे वय ३५ वर्षे रा. आंबेडकर ले आऊट उमरेड हे रिलायन्स जियो कंपनी मध्ये टेकोनोशियन या पदावर कार्यरत आहे. फिर्यादी हे आपले घरी हजर असतांना रात्री ०२.१२ वा. आलेसुर येथील टॉवर मधिल पावर केबल व जिपी एस केबल एकुण लांबी ७० मिटर कि. २५,०००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश झिंगरे मो.नं. ८३२९८६१२६६ हे करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. वेलतुर** :– अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा देवळी कला येथे दिनांक २९/०३/२०२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. मृतक नामे– सौ.सपना शेषराव उरकुडे वय २२ वर्ष ही फिर्यादीची मुलगी असुन तिचे १० महिण्यापुर्वी आरोपी क्रमांक १ सोबत लग्न झाले होते. आरोपी क्र. १) शेषराव दादाजी उरकुडे, वय ३४ वर्ष, रा. देवळी कला हा लग्नापासुन त्याची पत्नी मृतक सपना हिचाशी चांगला वागत नव्हता. त्याच्यात लग्नानंतर अनेक दिवस कोणतेही शारीरिक संबंध झाले नव्हते. फिर्यादीने अनेक वेळा आरोपी क्रमांक १ ला या संबंधाने विचार पुस केली असता तो गोष्ट टाळायचा दि. २८.०३.२०२२ रोजी आरोपी क्र. १ व २ याने मृतक महीलेस कोणत्यातरी कारणावरून मारहाण केली होती. यात मृतक महीला चक्कर येवून पडली होती. तेव्हा आरोपी क्र १ याने मृतक महीलेस दवाखाण्यात नेले होते. मृतक महीलेला आता पती जवळ रहायची ईच्छा नसल्याने तिने फिर्यादीस फोन करून घरी घेउन जाण्याबाबत सांगीतले होते. फिर्यादीने मृतक महीलेस उदया संघ्याकाळी येतो असे संगीतले होते यातील आरोपी १) शेषराव दादाजी उरकुडे वय ३४ वर्ष रा. देवळी कला, २) माधव दादाजी उरकुडे, वय ३० वर्ष रा. देवळी कला यांनी मृतक महीलेस शारीरिक व मानसीक त्रास देवून आत्महत्यास प्रवृत्त केल्याने मृतक महीलेने गावातील शेतातील विहरीत उडी घेउन आत्महत्या केली आहे. सदर घटने बाबत पोस्टे वेलतर येथे मर्ग क्र ९/२०२२ कलम १७४ जाफौ प्रमाणे नोंद करण्यात आला असुन सदर मर्ग मधील चौकशी दरम्यान मृतक महीलेचा वडीलानी दिलेल्या बयानावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लता वसंता सेलोटे वय ४२ वर्ष रा.भुयार ता पवनी जि.भंडारा यांचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपी विरुध्द कलम ४९८ (अ), ३०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/नितेष डोर्लीकर वेलतुर मो.क्र. ८८८८२९१२३४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत मौजा भंडाळा शिवार खापा येथे दिनांक ३०/०३/२२ वे ०५.०० वा. सुमारास एमएच— ४०/एन—१४५५ क्रमांकाचा पिकअप गाडीचा चालक आरोपीने आपले गाडीत लसून बोरया लोड भरून लसूनचे मालवाल्या ईसमाला गाडीमध्ये बसवून नागपूरकडे घेवून जात असतांना आपल्या ताब्यातील वाहान भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून कांचन बाला चोपडा यांच्या शेताजवड रोडचे बाजूने पल्टी केले व त्यात बसलेले ईसम नामे **लक्ष्मण मंजू भलावी वय ५० वर्ष, रा. छेडीया तह बिछवा (म.प्र) ह.मु** हा गंभीर जखमी होवून जागीच मरण पावला व गाडीत बसलेले इतर दोन ते तिन अनओळखी इसम जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कबिर दानाशाहा भलावी, वय २६ वर्ष, रा. छेडीया तह बिछवा (म.प्र) ह.मु किरनापूर अशोक धोटे यांच्या शेतात यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर मो.क्र. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे दिनांक ३०/०३/२२ चे ०९.०० वा. चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादीचे वडील मृतक पोहवा/यशवंत नागो धमगाय ब.नं. २७ वय ५४ वर्षे नेमणुक पोस्टे देवलापार रा. शितलवाडी रामटेक यांचे पोटात दुखत असल्यामुळे ते झोपले तेव्हा फिर्यादिची आई हीने त्यांना ज्युस पिण्याकरीता उठवले असता मृतकची कोणतीही हालचाल न झाल्याने त्यांना उपचार कामी उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नेहान्त यशवंत धमगाये, वय २९ वर्ष, रा. शितलवाडी रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मनोहर राऊत पोस्टे रामटेक मो.क्र. ९४२३६२८३०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**